पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोकअहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: www.sus.ac.in ई-मेल: Purchaseu2019@sus.ac.in, fao@sus.ac.in


जा.क्र.पुअहोसोविसो/विवले/खभांवि/२०२५/ 312 दिनांक: - 8 SEP 2025

**प्रति**

-------------------------

-------------------------

**विषय: प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील मातोश्री मुलांचे वसतिगृह येथील मेस वार्षिक दरकरारावर चालविणेकरिता दरपत्रके मागविणेबाबत...**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठातील मातोश्री मुलांचे वसतिगृह येथील मेस चालविणेकरिता वार्षिक दरकरार करावयाचे आहे. तरी आपले अपेक्षित दर GST करासह अंदाजपत्रकामधील {***SCHEDULE - B***} तपशिलाप्रमाणे दरपत्रकामध्ये भरुन मा. वित्त व लेखा अधिकारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या नावे सीलबंद लिफाफ्यात पाठवावे. दरपत्रकासंदर्भात सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

वरील कामाचे दरपत्रक, सुचना सोलापूर विद्यापीठाच्या *http://sus.ac.in* या संकेतस्थळावर ***(Quotation)*** या शिर्षकाखाली उपलब्ध आहे. **तसेच सोबत जोडलेल्या Schedule-B मधील तपशिलाप्रमाणे दरपत्रक सादर करावे.**

| अ.क्र | तपशिल | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | दरपत्रके प्रकाशित करण्याचा दिनांक व वेळ | ०८/०९/२०२५ | | वित्त व लेखा विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग, केगांव, सोलापूर- ४१३ २५५ |
| २. | दरपत्रके स्विकारण्याची दिनांक व वेळ | ०८/०९/२०२५ | | |
| ३. | दरपत्रक सादर करणे अंतिम दिनांक व वेळ | १६/०९/२०२५ | सांय. ०६.०० | |
| ४. | दरपत्रक उघडण्याचा दिनांक/वेळ आणि ठिकाण (शक्य झाल्यास) | १७/०९/२०२५ | दु. ०३.०० | |

(सीए. एम.एस. खराडे)

**वित्त व लेखा अधिकारी**

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर

सोलापूर पुणे महामार्ग, केगांव, **सोलापूर** - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
website: http://sus.ac.in

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ परिसरातील मुलांच्या वसतिगृहातील मेस चालविणे.

## निविदा फॉर्म

**निविदा शुल्क- रु.१,०००/-**

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
फोन नं.०२१७ २७४४७७० Website: https://www.sus.ac.in

**शै.वर्ष २०२५-२६ करीता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आवारातील वसतिगृह येथील मुलींची मेस, मुलांचे मेस चालविण्यासाठी निविदा/दरपत्रक सूचना**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर खालील कामाचे जाहीर निवीदा/दरपत्रक [तांत्रिक व दराची] मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | बयाणा रक्कम | निविदा शुल्क |
|---|---|---|---|
| १. | मुलांच्या वसतिगृह येथील मेस चालविणे. | रु.५,०००/- | रु. १,०००/- |

वर नमूद केलेल्या कामासाठी तत्सम कामाचा अनुभव असणाऱ्या मक्तेदारांकडून मोहोरबंद दोन लिफाफा पध्दतीमध्ये दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रक फॉर्म विक्री दि.०८/०९/२०२५ पासून सुरु राहील. सदर दरपत्रक फॉर्म फी व बयाणा रक्कम जमा पावतीसह भरुन दि.१६/०९/२०२५ रोजी सायं. ०६.०० वाजेपर्यंत वित्त व लेखा विभागाच्या रोकड विभागाकडे जमा करणे बंधनकारक आहे. ठेकेदाराकडून निविदेमधील नमूद केलेल्या दराबाबत वाटाघाटी केल्या जाणार नाहीत.

विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे स्वास्थ उत्तम राहण्यासाठी जेवणाचा दर्जा उत्कृष्ठ असणे आवश्यक असल्याची बाब विचारात घेता, प्राप्त झालेल्या पात्र दरपत्रकांपैकी केवळ न्युनतम दराचा विचार न करता दरपत्रकधारकांचा शैक्षणिक संस्थामध्ये मेस/उपहारगृह चालविण्याचा अनुभव इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन दरपत्रक स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार विद्यापीठास राहतील.

शक्य झाल्यास प्राप्त दरपत्रके दि.१७/०९/२०२५ रोजी दु. ०३.०० वाजता उघडण्यात येतील. कोणतेही कारण न देता कोणतीही दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे. याबाबत अधिक माहिती विद्यापीठाच्या http://sus.ac.in या संकेतस्थळावर Quotation या शिर्षकाखाली उपलब्ध आहे.

| | |
|---|---|
| जाहिरात क्र. पुअहोसोविसो/कुलसचिव कार्यालय/२०२५/<br>दिनांक: ०८/०९/२०२५ | डॉ. अतुल लकडे<br>प्र.कुलसचिव |

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

फॉर्म नं-

रुपये-१०००/-

## निविदा फॉर्म

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कामाचे नांव | : | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ परिसरातील मुलांच्या वसतिगृहातील मेस चालविणे. (परिशिष्ट - **अ** प्रमाणे) |
| | कामाचा कालावधी | : | (११ महिने) |
| २. | को-या निविदेचे शुल्क | : | रुपये- १०००/- (विना परतावा) |
| ३. | को-या निविदा मिळण्याचा कालावधी (कार्यालयीन वेळेत) | : | दि. ०८/०९/२०२५ ते दि. १६/०९/२०२५ (सांय.०६.०० पर्यत) कार्यालयीन वेळेत |
| ४. | बयाणा रक्कम | : | रुपये- ५०००/- (ऑनलाईन) |
| ५. | निविदा खरेदीदारांचे नांव | : | ______________________ ______________________ |
| | | | **अधीक्षक (मातोश्री मुलांच्या वसतिगृह) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर** |

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

## (ठेकेदारांनी भरावयाची माहिती)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कामाचे नांव व कालावधी | : | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ परिसरातील मुलांच्या वसतिगृहामधील मेस चालविणे. (परिशिष्ट- अ प्रमाणे) |
| २. | ठेकेदारांचे नांव | : | |
| ३. | ठेकेदारांचा संपुर्ण पत्ता | : | |
| ४. | टेलीफोन/मोबाईल नंबर | : | |
| ५. | पॅन नंबर | : | सोबत झेरॉक्स जोडावी. |
| ६. | को-या निविदेची किंमत | : | रुपये-१०००/- [विना परतावा] |
| | अ. रोखीने भरणा केला असल्यास | : | पावती क्रमांक- दि- / /२० |
| | ब. संकेतस्थळावरुन को-या निविदेची प्रत घेतली असल्यास | : | धनादेश क्र- दि-<br>बॅकेचे नांव----------------शाखा------- |
| ७. | बयाणा रक्कम [परतावा रक्कम] | : | रु. ५,०००/- (ऑनलाईन) |
| | अ.रोखीने भरणा केला असल्यास | : | पावती क्रमांक- दि- / /२० |
| | ब.डी.डी.ने भरणा केलेली असल्यास | : | धनादेश क्र. --------------दि. / /<br>बैंकेचे नांव----------------शाखा------ |

**ठेकेदारांची स्वाक्षरी व शिक्का**

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

# परिशिष्ठ - अ

| अ.क्र | तपशिल | प्रमाण | दर रु. मध्ये | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | **दोन्ही वेळचे जेवण** (प्रति महिना) | अमर्यादित | | |
| | १. आठवडयात एक दिवस फिस्ट असेल. | | | |
| | **२. सकाळचे आणि संध्याकाळचे जेवण**<br>चपाती, पातळ भाजी, सुक्की भाजी, भात, वरण<br>सोबत- कांदा-लिंबू / कोशिंबीर / लोनच / शेंगा चटणी (प्रत्येक दिवशी वेगळे)<br>टिप - सकाळी व संध्याकाळच्या जेवणात वेगवेगळी भाजी आवश्यक आहे. | | | |
| | **३. उपवास करीता**<br>शाबुदाना-दही / भगर- शेगांची पातळ भाजी<br>सोबत - शेंगा लाडु / केळी (नग-२) | | | |
| | **आठवडयात जेवणात समाविष्ठ करण्याचे आयटम** | | | |
| १. | पालेभाजी / मिरची ठेचा / भाजनीचे थालीपीट / वांगी / गवार / दोडका / बटाटे / भोपळा / पालक चुका / आळुची पाने / शेवगा शेंग / कडी खिचडी / मोड आलेली कडधान्य (वटाणे / हरबरा /मटकी / मुग / हुलगे इ.) दही - ताक | | | |
| २. | आठवडयात एक दिवस (एक वेळ सकाळी) - इडली सांबर आणि चटणी / पाव भाजी / मिसळ पाव / पुरी - भाजी<br>सोबत - बुंदी लाडु / जिलेबी / गव्हाची खीर / शेवयाची खीर (मर्यादीत) | | | |
| ३. | स्पेशल जेवणाच्या दिवशी सण आला तर सणाचे स्पेशल जेवण दिल्यास चांगले होईल. | | | |
| | **बुधवार मुलांच्या मेस मधील संध्याकाळी एक वेळचे स्पेशल जेवण खालीलप्रमाणे द्यावे.** | | | |
| | चपाती, पनीर भाजी किंवा तत्सम भाजी, मसाले भात ,शेंगा पोळी- (मर्यादीत), कोशिंबीर, रोस्टेड पापड सोबत-(भज्जी /बुंदीलाडु/जिलेबी/गुलाब जामुन / गव्हाची खिर/शेवयाची खीर / बालुशाही / श्रीखंड / आम्रखंड (मर्यादीत), | | | |

**ठेकेदाराची स्वाक्षरी व शिक्का**

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## - सूचना व अटी -

१. मेसचा करार हा ११ महिन्याच्या कालावधीकरिता असून तो मेसचा ताबा घेतल्यापासून चालू होईल.

२. ठेकेदाराने मेस चांगल्याप्रकारे चालवित असल्याचे विद्यापीठास आढळून आल्यास करार पूढे चालू ठेवता येईल. विद्यापीठाचा निर्णय ठेकेदारावर बंधनकारक असेल.

३. ठेकेदाराने खालील बाबींची पुर्तता केल्यावरच त्याची निविदा ग्राहय धरण्यात येईल.

अ कराराच्या तारखेपासून तीन दिवसाच्या आत **सुरक्षा ठेव रक्कम रु.५०,०००/-[अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त]** इतकी विद्यापीठाच्या कार्यालयाकडे जमा करणे बंधनकारक आहे. अन्यथा करार रद्द करण्यात येईल.

ब मेसचा ताबा घेण्यापुर्वी कुलसचिवांबरोबर स्टॅंप पेपरवरती करार करणे बंधनकारक आहे.

क मेस तात्काळ चालू करावे किंवा मेस समितीने ठरवून दिलेल्या मुदतीत चालू करावे अन्यथा ठेका रद्द करण्यात येईल.

४. शैक्षणिक संस्था (महाविद्यालय/विद्यापीठ) /रुग्णालय/शासकीय किंवा निमशासकीय /नामवंत खाजगी औद्योगिक कंपन्यामधील मेस मध्ये प्रतिदिन १०० व्यक्तिना जेवण पुरवठा केल्याचा किमान १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

५. विद्यापीठाकडून हलक्या अगर निकृष्ट दर्जाच्या वस्तू मान्य केल्या जाणार नाहीत.

६. जेवणाचे चार खाडे झाल्यास ते हिशोबात धरले जाणार नाही. पण त्यानंतरचे खाडे हिशोबात धरण्यात येतील. तसेच दिवाळी सुट्टी, उन्हाळी सुट्टी व विद्यापीठाने कार्यक्रमानिमित्त दिलेल्या सुट्टी असतील तर मेस मध्ये जेवण केले आहे तेवढेच मेस बिल दिले जाईल.

७. मेसमध्ये वापरण्यात येणारे जिन्नस चांगल्या दर्जाची असावेत. त्यात तडजोड केली जाणार नाही.

८. ज्या दिवशी विद्यार्थ्यांचा उपवास आहे. त्या दिवसाच्या आधी विद्यार्थ्यांनी कुपन घेऊन जावे.

९. ठेकेदाराने खाण्याच्या सर्व वस्तू वर माश्या बसू नये म्हणून जाळीचा वापर करावा.

१०. **मुलांच्या मेसकरिता** ठेकेदाराला मेसच्या भाडयापोटी **रु.८,०००/-** प्रति महिना दयावे लागतील. या व्यतिरिक्त मिटर प्रमाणे वापरलेल्या विजेचे भाडे प्रती युनिट **रु.०८/-** (वापरलेल्या वीजेचे रिडींग हे प्रत्येक महिन्याच्या अखेरला घेण्यात येईल) प्रमाणे विद्यापीठास अदा करावे लागेल. सदरचे भाडे व विज बील महिना संपल्यानंतर पुढील महिन्याच्या एक तारखेला जमा करावे (म्हणजेच ऑगस्ट महिन्याचे भाडे व वीज बील हे एक सप्टेंबरला जमा करावे). एक तारखेला भाडे व वीज बील वित्त व लेखा विभागात जमा न केल्यास भाडे व लाईट बील जमा करेपर्यंत प्रति दिन रु.१००/- इतका दंड द्यावा लागेल.

११. ठेकेदाराला मेसचा वापर हा फक्त अन्न तयार करुन विद्यार्थी, कर्मचारी इत्यादींना पुरवण्याकरिता करावा. राहण्यासाठी किंवा इतर गोष्टीसाठी मेसचा वापर करता येणार नाही.

१२. ठेकेदाराकडे स्वत:चा जीएसटी नंबर व पॅन नंबर असणे आवश्यक आहे व त्याने नमूद केलेले दर हे जीएसटीसह असावेत.

१३. ठेकेदाराने फक्त व्यावसायिक (Commercial) LPG गॅस चा वापर करावा. स्वंयपाकासाठी लाकडाचा इंधन म्हणून वापर करता येणार नाही.

१४. ठेकेदाराने मेसचे मासिक भाडे प्रत्येक महिन्याला एक तारखेला विद्यापीठाकडे जमा करावे अन्यथा झालेला करार तत्काळ रद्द करण्याचा अधिकार कुलसचिवांना राहिल.

१५. मेस व त्याचा परिसर स्वच्छ ठेवणे हे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

१६. मेस व त्याचा परिसर अस्वच्छ आढळल्यास प्रत्येक वेळी रु. ५००/- इतका दंड आकारण्यात येईल. स्वत: कामगार नेमून मेस वं परिसर स्वच्छतेची जबाबदारी ठेकेदारांची राहिल.

१७. दररोज मेसची पाहणी व तपासणीची जबाबदारी ही वसतीगृह गृहपाल यांची राहील. तपासणीच्या वेळी एखादा पदार्थ भेसळ किवा हलक्या दर्जाचा आढळल्यास ठेकेदाराला रु. १,०००/- इतका दंड कुलसचिव गृहपालाच्या शिफारसीवरुन करतील.

१८. ठेकेदाराने किं वा त्याच्या कोणत्याही कर्मचाऱ्याने मेसचा वापर हा राहण्यासाठी करु नये.

१९. ठेकेदाराने व त्याच्या सर्व कर्मचाऱ्यांनी विद्यापीठ वैद्यकिय अधिकाऱ्यांमार्फत वैद्यकिय तपासणी करुन घेणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने व त्याच्या सर्व कर्मचाऱ्यांनी स्वच्छ कपडे परिधान करणे बंधनकारक आहे.

२०. करारात मान्य केलेल्या वस्तू पैकी किमान ७५ टक्के वस्तू रोज मेसमध्ये उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

२१. मेसमध्ये काम करणा-या कर्मचाऱ्यास जर काही इजा, अपघात झाल्यास किंवा मेस आवारातून एखादी वस्तु निष्काळजीपणामुळे गहाळ झाल्यास ती सर्वस्वी ठेकेदाराची जबाबदारी राहिल.

२२. ठेकेदारांने मेसचा ताबा घेण्यापुवी रु.१००/- च्या Non-Judicial स्टँप पेपरवरती करार करणे आवश्यक आहे. हा करार पत्र मिळाल्यापासून सात दिवसाच्या आत करावा अन्यथा ठेकेदाराचा हक्क संपुष्टात येईल.

२३. मेसमधील विद्यापीठाच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान झाल्यास, त्या करिता ठेकेदारास जबाबदार धरण्यात येईल व त्याची भरपाई करुन घेतली जाईल.

२४. मेस उघडण्याची व बंद करण्याची वेळ मेस हॉल मध्ये लावावी, आवश्यकतेप्रमाणे वरील वेळेत बदल हा मेस समिती कुलसचिवांच्या वतीने सुचवेल.

२५. ठेकेदाराने Shop Act चे नियम मोडू नयेत ते मोडले गेल्यास त्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

२६. ठेकेदारास अंशत: किंवा पुर्ण मेस चालविण्यास दुसऱ्या ठेकेदाराला देता येणार नाही. तसे आढळल्यास ठेकेदारांवर कार्यवाही करण्यात येईल.

२७. ठेकेदाराने चहा, अल्पोपहार इ. स्वत:च्या जबाबदारीवर उधार दयावेत. मेस समिती/कुलसचिव असा कोणताही दावा कोणत्याही परिस्थितीत विचारात घेणार नाहीत.

२८. करारात नमुद केलेल्या वरील पैकी कोणत्याही अटी व शर्तीचे करार कालावधीत उल्लंघन झाल्याचे आढळल्यास करार तात्काळ रद्द करण्याचे व सुरक्षा ठेव रक्कम परत न देण्याचे पुर्ण अधिकार कुलसचिवांना आहेत. अशा परिस्थितीत कुलसचिवांचा निर्णय अंतिम राहिल व तो ठेकेदारावर बंधनकारक असेल.

२९. करार चालू करतेवेळी मेसमधील सर्व वस्तुच्या यादीवर सही करावी लागेल व ज्यावेळी हा करार संपुष्टात येईल तेव्हा सर्व वस्तु चालू स्थितीत विद्यापीठास परत कराव्या लागतील. त्यात कोणत्याही वस्तू कमी किंवा नादुरुस्त आढळल्यास त्याची किंमत सुरक्षा ठेवीच्या रकमेमधून वसुल केली जाईल.

३०. कोणत्याही कारणाने कुलसचिवांनी करार रद्द केल्यावर ठेकेदाराने नोटीस दिल्यापासून किवा मेसच्या प्रवेश दारावरती चिकटवल्यापासून एक आठवडयात मेसचा परिसर रिकामा करावा लागेल. मेस रिकामी करण्यास एक आठवडयापेक्षा जास्त वेळ लागल्यास सूरक्षा ठेव रक्कम परत केली जाणार नाही.

३१. सर्वात कमी दराची निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार प्रशासनास आहेत.

३२. सदरचा करार एक महिन्याच्या पुर्व सूचनेने कुलसचिव किंवा ठेकेदार रद्द करु शकतील.

३३. विद्यापीठ मेसकरिता फक्त मेस हॉलमध्ये जेवणा करीता टेबल व बाकडे उपलब्ध करुन देईल. या व्यतिरीक्त जेवण बनविण्यासाठी लागणारी सर्व भांडी, ताट, वाटया, स्वयंपाकाची उपकरणे इ. पुरवणार नाही, ती ठेकेदाराला स्वत: आणावी लागतील. जेवण / नाष्टा स्टीलच्या ताट व वाटीमध्येच देण्यात यावे.

३४. दर करारामध्ये दिलेल्या जेवणाचे मेन्युकार्ड मेसमध्ये दर्शनी भागामध्ये लावणे मेस चालकास बंधनकारक राहील.

३५. शिल्लक राहिलेल्या अन्नाची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी मेंस चालकाची राहील.

३६. ज्या ठेकेदारांनी यापूर्वी विद्यापीठातील मेस चालविण्याचा मक्ता घेतलेला होता. अश्या ठेकेदारास मेस करिता दरपत्रके जमा करावयाची असल्यास विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या काम पुर्णत्वाचा दाखला दरपत्रकाच्या तांत्रिक लिफाफामध्ये जोडणे अनिवार्य राहील. जर काम पुर्णत्वाचा दाखला न जोडल्यास त्यांना अपात्र ठरविण्यात येईल.

३७. ठेकेदार व प्रस्तुत विद्यापीठ यांच्यात न्यायालयीन किंवा इतर प्रकरण प्रलंबीत असल्यास तसे स्पष्ट नमूद करावे.

३८. मेस / उपहारगृहामध्ये बालकामगार यांची नेमणूक करु नये.

वरीलप्रमाणे सर्व सुचना व अटी मला मान्य असून माझ्यावर बंधनकारक आहेत.

**ठेकेदारांची स्वाक्षरी व शिक्का**

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## निविदा/दरपत्रक भरण्यासाठी सूचना

१. निविदा/दरपत्रक कार्यालयीन वेळेत सोमवार ते शुक्रवार (२ रा व ४ था शनिवार व सार्वजनिक सुट्टी सोडून) ११ ते ३ या वेळेत स्विकारल्या जातील.
२. मुलांच्या व मुलींच्या वसतीगृहातील मेससाठी वेगवेगळी निविदा भरणे आवश्यक आहे.
३. मुलांची मेस एका ठेकेदाराला चालविण्यास देण्यात येईल.
४. मुलांच्या वसतीगृहामध्ये २०० ते २६० मुले राहतात, यात बदल होवू शकतो.
५. जर विद्यापीठास ५ दिवसापेक्षा जास्त सलग सुट्टी असेल किंवा शैक्षणिक उपक्रमाकरिता गेलेले असतील तरच अधिकची खाडे पकडले जातील.
६. मुलगा/मुलगी जर गावाला गेला/गेली तरच त्याचे/तिचे प्रत्येक महिन्याला जास्तीत जास्त पाचच खाडे धरले जातील.
७. जेवणासाठी चांगल्या प्रतिचा गहू, ज्वारी, तांदूळ, तेल, भाज्या इ.वापरणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.
८. सर्व निवीदा/दरपत्रक, वरील सूचनांचे पालन करुन तयार कराव्यात व विद्यापीठ कार्यालयात जमा कराव्यात.
९. अपूर्ण निविदा/दरपत्रक ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.
१०. निविदा/दरपत्रक स्विकारण्याचा अंतिम दिनांक व वेळ संपल्यानंतर प्राप्त होणा-या निविदा/दरपत्रक स्विकारण्यात येणार नाहीत. वेळ व दिनांक निविदा/दरपत्रक सूचनेत नमूद करण्यात आली आहे.
११. निविदा/दरपत्रक ह्या विहित नमून्यातच असाव्यात. दरपत्रकाच्या पानावर ठेकेदाराची सही व शिक्का असावा.
१२. बयाणा रक्कम सोबत नसलेल्या निविदा/दरपत्रक नाकारण्यात येतील.
१३. फक्त शाकाहारी अन्न तयार करुन पूरविण्यात यावे.
१४. सदरचा करार हा फक्त ११ महिन्याकरिता आहे.
१५. निविदा/दरपत्रक मंजुर झाल्यानंतर <u>सुरक्षा ठेव रक्कम</u> रु.५०,०००/- [अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त] इतकी विद्यापीठाकडे जमा करावी लागेल.
१६. ठेकेदाराने मेसमध्ये काम करणाऱ्या कामगारांची यादी विद्यापीठाच्या कार्यालयाकडे जमा करणे बंधनकारक आहे.
१७. मेस मधील पदार्थांसाठी मागणी मध्ये होणऱ्या चढ उताराला विद्यापीठ जबाबदार असणार नाही.
१८. मेस ठेकेदाराने मेसमध्ये उपस्थित असणे आवश्यक आहे.
१९. निविदा/दरपत्रक दोन बंद लिफाफाच्या पध्दतीमध्ये सादर कराव्यात.

### तांत्रिक निविदा लिफाफा क्र. १:

१. बयाणा रक्कम भरलेली पावती,
२. नेमका विशिष्ट अनुभवाचा दाखला (अनुभव प्रमाणपत्रावार कामाचे स्वरुप व कालावधी नमुद असणे आवश्यक आहे)
३. सूचना व अटी मान्य असल्याबाबतचे स्वाक्षरी व शिक्का,
४. अद्यावत शॉप ॲक्टचा परवाना,
५. अद्यावत अन्नभेसळ प्रतिबंधक परवाना,
६. पॅनकार्डची झेरॉक्स,
७. जीएसटी नंबर प्राप्त झाल्याचे शासनाचे नोंदणी प्रमाणपत्र.
८. सदर लिफाफांवर <u>'तांत्रिक निविदा 'असे</u> नमूद करावे.

## निविदा लिफाफा क्र.२:

१. दुसऱ्या लिफाफामध्ये निविदा फार्म मधील **परिशिष्ट 'अ'** व दर नमूद करुन बंद करावा व त्यावर **"दराची निविदा"** असे नमुद करावे.

२. सर्वसाधारण मेस चालविणे करीता खानावळीतील कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे आवश्यक आहे. तसेच मिष्टान्न बाबत सविस्तर तपशील नमूद करणे आवश्यक आहे.

३. जेवणाच्या दर्जाची दैनंदिन तपासणी वसतिगृह, अधिक्षीका व गृहपाल यांचे मार्फत होणे आवश्यक आहे. जेणेकरुन भेसळयुक्त अन्नामुळे विद्यार्थ्यांना कोणतीही हानी पोहचणार नाही. विषबाधा तसेच आरोग्यास हानिकारक पदार्थ यामुळे विद्यार्थ्यांच्या जिवीतास तसेच आरोग्यास धोका होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**ठेकेदाराची स्वाक्षरी व शिक्का**

सोलापूर विद्यापीठ

॥ विद्यया संपन्नता ॥

NAAC Accredited-2022

'B++' Grade (CGPA 2.96)

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

### सकाळ / संध्याकाळचे जेवण देण्याचा कालावधी

| अ.क्र. | तपशील | वेळ |
|---|---|---|
| १ | सकाळचे जेवण | सकाळी ९:०० ते १:०० वाजेपर्यंत |
| २ | संध्याकाळचे जेवण | संध्याकाळी ७:०० ते ९:३० वाजेपर्यंत |

ठेकेदाराची स्वाक्षरी व शिक्का